NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १९१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## सोमवार, दि. २७ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९१ वी बैठक **सोमवार, दि.२७ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी आपली अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०१] | १. दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि.०६ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.५ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.<br>पूर्वीचा ठराव<br>दि.०६/१२/२०२४ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या खरेदी समितीच्या दि.०६/१२/२०२४ रोजीच्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतील विषय क्र.२ वर झालेल्या ठरावामध्ये खालीलप्रमाणे सुधारित मंजुरी देऊन कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>ठराव क्र. २<br>१. विद्यापीठास आवश्यक असलेले Scanning, ICR, OCR, Digitization of Students Mark Sheet and web portal Devlopment या करीता न्युनतम दर असलेल्या M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd, Mumbai या फर्मला रु.१,१९,३६,०००/- (अधिक १८% GST) या रकमेइतके काम देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>२. वरील कामासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेतील ledgers व Old mark sheet हे समान दर असलेल्या कामांबाबत नमूद असलेल्या प्रत्येकी नगाचा विचार न करता दोन्ही मिळून एकूण २५ लाख कागदपत्रांचे Scanning प्रथम करावे असे सर्वानुमते ठरले.<br>३. निविदेमध्ये प्रसिध्द केलेल्या ledgers व Old mark sheet चे Scanning पूर्ण झाल्यानंतर Office Record मधील कागदपत्रांचे Scanning करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>४. Degree Certificate व Design Develop and Deployment of Web Portal ONE TIME COST चे काम दिलेल्या दरामध्ये करुन घ्यावे असे सर्वानुमते ठरले.<br>५. निविदेमध्ये प्रसिध्द केलेल्या Office Record वगळता उर्वरीत सर्व जी निविदा प्रस्तावामध्ये नमूद केली आहे ती कामे ही एक वर्षाच्या आत कंपनीने पूर्ण करावी असे करारपत्रात नमूद करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>दुरुस्त केलेला ठराव<br>उपरोक्त ठराव M/s. Edulab Educational Exchange Pvt. Ltd, Mumbai या फर्मला दिलेल्या परीक्षेच्या कामकाजाच्या यशस्वीतेचा आढावा घेऊन नंतर या ठरावाबाबत निर्णय घ्यावा, तोपर्यंत सदरचा ठराव तहकूब करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | वित्त व लेखा विभाग |
| | २. दि.०६ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९० व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | १. दि.२९ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८९ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>३. दि.०६ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९० व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.२९ नोव्हेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२. दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १८९ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>३. दि.०६ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९० व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व BRAINY N BRIGHT EDUTECH PRIVATE LTD, Bangalore यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर BRAINY N BRIGHT EDUTECH PRIVATE LTD, Bangalore यांच्यामध्ये सामंजस्य करार करणेबाबत विद्यापीठाच्या MoU सेल कडून तपासून घेण्यात आली आहे. अंर्तगत विद्यार्थी यांचे आंतरवासिता (Internship), On Job Traning (OJT), आदान-प्रदान व कॉन्फरन्स, सेमिनार यांचे संयुक्त आयोजन, पब्लिकेशन इत्यादी गोष्टींचा समावेश आहे.<br>BRAINY N BRIGHT EDUTECH PRIVATE LTD, Bangalore यांच्यासोबत अशा स्वरुपाचा सामंजस्य करार केल्यास विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीकरीता आंतरवासिता (Internship), On Job Traning (OJT) यांसबंधित फायदेशीर होईल.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व BRAINY N BRIGHT EDUTECH PRIVATE LTD, Bangalore यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ. | आंतरवासिता कक्ष |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व BRAINY N BRIGHT EDUTECH PRIVATE LTD, Bangalore यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराच्या मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **BioEra Life Science Pvt. Ltd., Pune आणि Gowin Enterprises Pvt. Ltd., Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ.**<br>टिपणी: BioEra Life Science Pvt. Ltd., Pune आणि Gowin Enterprises Pvt. Ltd., Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना Internship, Job Placement, Collaboration साठी फायदा होणार आहे. सदर सामंजस्य कराराचा मसूदा नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या विभागाकडील MoU Cell Committee कडून तपासून घेतला असून सदर सामंजस्य करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(झ) नुसार व्यवस्थापन परिषदेसाठी मान्यता घ्यावी लागणार आहे.<br>सबब, BioEra Life Science Pvt. Ltd., Pune आणि Gowin Enterprises Pvt. Ltd., Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | **BioEra Life Science Pvt. Ltd., Pune आणि Gowin Enterprises Pvt. Ltd., Solapur व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराच्या मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **Infinite Biotech Institute of Research and Analytics, Sangli व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ.**<br>टिपणी: Infinite Biotech Institute of Research and Analytics, Sangli व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना Internship, Job Placement, Collaboration साठी फायदा होणार आहे. सदर सामंजस्य कराराचा मसूदा नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या विभागाकडील MoU Cell Committee कडून तपासून घेतला असून सदर सामंजस्य करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(झ) नुसार व्यवस्थापन परिषदेसाठी मान्यता घ्यावी लागणार आहे.<br>सबब, Infinite Biotech Institute of Research and Analytics, Sangli व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | **Infinite Biotech Institute of Research and Analytics, Sangli व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराच्या मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | प्रस्तुत विद्यापीठातील भूशास्त्र संकुल व Centre for Research Technology Development (CRTD) Sinhgad Institute, Solapur यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: उपरोक्त दोन्ही संस्थामध्ये सामंजस्य करार करण्यासाठी सदरचा सामंजस्य कराराचा मसूदा नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्याकडून (MoU Cell) तपासून घेण्यात आला आहे.<br>त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदर सामंजस्य कराराचा फायदा विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठी मदत होणार आहे. भविष्यात होणाऱ्या विद्यापीठस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यासाठी याचा फायदा दोन्ही संस्थांना होणार आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील भूशास्त्र संकुल व Centre for Research Technology Development (CRTD) Sinhgad Institute, Solapur यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ. | भूशास्त्र संकुल |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठातील भूशास्त्र संकुल व Centre for Research Technology Development (CRTD) Sinhgad Institute, Solapur यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच विद्यापीठाकडून करण्यात आलेल्या सर्व सामंजस्य कराराचे परिणाम व त्याच्या प्रगतीबाबत देखरेख व मार्गदर्शन करण्यासाठी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळामार्फत खालीलप्रमाणे "MoU Review Committee" गठित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. अजित माधव पाटणकर<br>व्यवस्थापन परिषद सदस्य | अध्यक्ष |
| २. | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे<br>व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ३. | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ४. | डॉ. अनिल अर्जुन घनवट<br>प्रशिक्षण प्लेसमेंट अधिकारी | सदस्य |
| ५. | डॉ. विकास भाऊराव पाटील<br>प्र.संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य-सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमाकरीता संलग्नित महाविद्यालयांकडून देणगीस्वरुपात रु.५,०००/- इतका निधी विद्यापीठाकडे जमा करुन घेण्याची व त्यासाठी पत्रव्यवहार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: २३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव समितीच्या बैठकीतील विषय क्र.०३ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.<br>"त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त महाविद्यालयाची भुमिका व जबाबदारी याबाबत चर्चा करणे." त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.<br>ठराव: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमाकरीता संलग्नित महाविद्यालयांनी रु.५,०००/- इतका निधी देण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>महाविद्यालयाकडून प्राप्त होणारा निधी हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन अंतर्गत त्रिशताब्दी जयंती महोत्सव निधी असे स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षक उघडून त्यामध्ये जमा करुन घेण्याचे ठरले व प्राप्त निधीतून रथयात्रा आणि अहिल्या महिला स्वसंरक्षण शौर्य प्रशिक्षण कार्यक्रमास देण्याचे ठरले.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करणेसाठी निधी संकलन समिती खालीलप्रमाणे गठीत करण्याचे ठरले.<br>१) प्रा. देवानंद चिलवंत - अध्यक्ष<br>२) श्री. प्रल्हाद कांबळे - सदस्य<br>३) डॉ. विरभद्र दंडे - सदस्य<br>४) श्री. सचिन गायकवाड - सदस्य सचिव<br>सबब, उपरोक्त ठरावानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३१ (यझ) नुसार महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, लोकहितैषी, उद्योगसमूह आणि इतर हितसंबंधीत व्यक्तींकडून देणग्या, बक्षिसे आणि इतर स्वरुपातील वित्तीय सहाय्य स्वीकारणे आणि अशा देणग्या, बक्षिसे इत्यादी स्विकारण्यासाठी विद्यापीठ अनुसरावयाची कार्यपध्दती विहीत करणे या तरतुदीनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमाकरीता संलग्नित महाविद्यालयाकडून देणगी स्वरुपात रु.५,०००/- इतका निधी विद्यापीठाकडे जमा करुन घेण्यास व त्यासाठी पत्रव्यवहार करण्याची बाब विचारार्थ. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र |
| **ठराव:** | **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **विद्यापीठाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा परीक्षकांच्या नियुक्तीबाबत.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने नियुक्त लेखापरीक्षणाकडून विद्यापीठ लेख्यांची लेखापरीक्षा करुन घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सोलापूर विद्यापीठाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात झालेल्या व्यवहाराचे लेखापरीक्षण करुन घेण्यासाठी संवैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करावयाची आहे.<br>दि.०५/०३/२०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.१२ अन्वये विद्यापीठाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी M/s. SKVM & COMPANY, Solapur यांची लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सदर लेखापरीक्षक फर्मने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण वेळेत पुणे करुन अहवाल सादर केला आहे. त्यासाठी त्यांना रु.१,५९,३००/- GST सह फी अदा केली आहे. सदर वार्षिक लेखापरीक्षीत लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेने मान्यता दिलेली आहे.<br>M/s. SKVM & COMPANY, Solapur यांनी मागील वर्षाच्या फी, अटी व शर्तीप्रमाणे सन २०१४-२५ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षक म्हणून पुन:श्च नियुक्तीबाबत पत्राद्वारे विनंती केली आहे. सोबत पत्र जोडले आहे.<br>सबब, M/s. SKVM & COMPANY, Solapur यांनी पत्राद्वारे विनंती केले नुसार त्यांची विद्यापीठाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **विद्यापीठाचे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी M/s. SKVM & COMPANY, Solapur यांची लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे भरण्यात आल्याची बाब माहितीस्तव.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे दि.२० ते २२ जानेवारी, २०२२ रोजी नॅक बेंगलोर कडून 2nd Cycle अंतर्गत मूल्यमापन करण्यात आलेले होते. सदरच्या मूल्यमापनामध्ये आपल्या विद्यापीठाला B++ (CGPA २.९६) मूल्यांकन (दर्जा) प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचे 3rd Cycle मधील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा Annual Quality Assurance Report (AQAR) चे काम पूर्ण झाले आहे. सदरचा AQAR दि.२८/०२/२०२५ रोजीपर्यंत ऑनलाईनरीत्या नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर भरावयाचा आहे. यासाठी सदरचा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा AQAR व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवणे गरजेचे आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे भरण्यात आल्याची बाब माहितीस्तव. | आयक्युएसी विभाग |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक बेंगलोर यांच्या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे भरण्यात आल्याबाबतची नोंद घेण्यात आली.**<br>तसेच सदर Annual Quality Assurance Report (AQAR) मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती सूचविण्यात आली.<br>१. Annual Quality Assurance Report (AQAR) मधील अ.क्र.१.३, १.३.१ मध्ये विद्यापीठामधील अभ्यासक्रमातील Cross Cutting Issues जे Curriculum चा भाग असून त्यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. पर्यावरण संदर्भातील विद्यापीठामध्ये बरेचसे अभ्यासक्रम/कोर्सेस आहेत त्यांचाही उल्लेख करण्यात आलेला नाही.<br>२. अ.क्र. ३.४.७ मध्ये None of the above हे असे नमूद करण्यात येवू नये.<br>३. अ.क्र. ३.१.१ मध्ये Regular Grant update करण्यात यावी.<br>तसेच AQAR मध्ये आणखी काही दुरुस्त्या असल्यास त्यानुसार तपासून दुरुस्त्या सूचविण्यासाठी खालील समिती गठित करण्यात आली.<br><br>अ.क्र. / सदस्याचे नाव / पदनाम<br>१. / प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा / अध्यक्ष<br>२. / डॉ. समाधान दिगंबर पवार / सदस्य<br>३. / प्रा. गौतम सुबन्ना कांबळे / सदस्य-सचिव<br><br>त्याचप्रमाणे खालीलप्रमाणे "Mentoring for Research Proposal Research Scheme" समिती गठित करण्यात आली.<br><br>अ.क्र. / सदस्याचे नाव / पदनाम<br>१. / डॉ. प्रशांत मारुती पवार / अध्यक्ष<br>२. / डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड / सदस्य<br>३. / डॉ. शिवाजी विश्वास शिंदे / सदस्य<br>४. / डॉ. विकास भाऊराव पाटील, प्र. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य / सदस्य-सचिव | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **सहायक संचालक, लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, सोलापूर यांना विद्यापीठाच्या उपलब्ध जमिनीमधून दोन एकर जमीन कायमस्वरूपी देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सहायक संचालक, लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, सोलापूर यांनी त्यांच्याकडील सोला/का/७५७-७५९/२०२४ दि.२४/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा सोलापूर हे कार्यालय दि.२७ जानेवारी, २०२० रोजी तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीत कार्यान्वित करण्यात आले आहे. कार्यालयाच्या कामाचे स्वरूप पाहता कार्यालयास विद्यापीठाच्या उपलब्ध जमीनीमधून दोन एकर जमीन कायमस्वरुपी मिळणेबाबत कळविले आहे.<br>सहायक संचालक, लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, सोलापूर यांना प्रस्तुत विद्यापीठ परिसराचा प्रारुप आराखडा (Master Plan) यापूर्वी निश्चित करण्यात आले असून नियोजित जागेत इमारती बांधकाम व इतर कामे सुरु आहेत. तसेच वन विभाग, सोलापूर या कार्यालयाकडून वन जमीन असल्याचे विद्यापीठ कार्यालयास कळवित असल्याने प्रारुप आराखडा निश्चित केल्यानुसार विविध बांधकाम व विकास कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे विद्यापीठास जागेची कमतरता असल्याने जागा उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही असे यापूर्वी कळविण्यात आले आहे.<br>परंतु सहाय्यक संचालक, लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, सोलापूर यांनी पुनश्चः दि.२४/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये विद्यापीठाच्या उपलब्ध जमीनीमधून दोन एकर जमीन कायमस्वरुपी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.<br>सद्यस्थितीत मौजे केगाव ता. उत्तर सोलापूर येथील संपूर्ण परिसर वापरात असून मोकळी जागा अस्तित्वात नाही. मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर येथील परिसरात मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन, रुसा निधी अंतर्गत मुलांचे वसतिगृह, खेलो इंडिया योजनेंतर्गत मल्टीपर्पज हॉल व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक उभारणी व टॉवरचे बांधकाम सुरु आहे. पीएम-उषा निधी अंतर्गत विविध नवीन इमारतीचे बांधकाम करण्याची बाब प्रस्तावित आहे.<br>विद्यापीठाच्या मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर येथील बहुतांश जमीनी ह्या राखीव वन, माळढोक पक्षी अभयारण क्षेत्र व इको सेन्सीटीव्ह झोन क्षेत्र (ESZ) असल्याचे वन विभाग, सोलापूर या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर येथील फक्त निर्वणीकरण (Disforested) क्षेत्रात विविध बांधकाम व विकास कामे सुरु आहेत. तसेच वन विभाग, सोलापूर या कार्यालयाकडून वन जमीन असल्याचे कळविले असल्याने उपलब्ध जमीनीमध्ये विविध इमारतीचे बांधकाम व विविध विकास कामे करण्यास अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, सोलापूर या कार्यालयास त्यांनी मागणी केल्याप्रमाणे दोन एकर जागा उपलब्ध करून देणे शक्य होणार नाही.<br>सबब, सहायक संचालक, लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, सोलापूर यांना विद्यापीठाच्या उपलब्ध जमिनीमधून दोन एकर जमीन कायमस्वरुपी देण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| **ठराव:** | **सदरचा विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील पी.जी.डी.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: मा. प्र.प्राचार्य, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांचेकडून महाविद्यालयातील पी.जी.डी.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | बंद करावयाचा अभ्यासक्रम | बंद करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि. सोलापूर | बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी,जि.सोलापूर | पी.जी.डी.सी.ए | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून | कायम विनाअनुदानित |

सदर महाविद्यालयातील पी.जी.डी.सी.ए. या अभ्यासक्रमास तत्कालीन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी शैक्षणिक वर्ष १९९८-९९ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेली होती. महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रमास प्रस्तुत विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पर्यंत संलग्निकरणाच्या नुतनीकरणास मान्यता घेतली आहे. परंतु पी.जी.डी.सी.ए. अभ्यासक्रमाची घटती विद्यार्थी संख्या लक्षात घेवून संस्थेने बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयतील पी.जी.डी.सी.ए. अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

महाविद्यालय/विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरिक्त तुकडी किंवा अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(३) अन्वये स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्याचे अधिकार विद्यापरिषदेस आहेत. त्याअनुरोधाने दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.०८ नुसार खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्राचार्य डॉ. सुरेश रामचंद्र ढेरे (अध्यक्ष)
२) डॉ. अनिल मारुती साळुंखे (सदस्य)
३) प्राचार्य डॉ. एम. बी. गादेकर (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयातील पी.जी.डी.सी.ए. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(३)(४) मधील तरतूदीनुसार सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्यासंदर्भात दि.२५/११/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेने ठराव क्र.२१ अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.<br>सबब, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील पी.जी.डी.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील पी.जी.डी.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठी ज्या महाविद्यालयांनी पुढील वर्षांचे शुल्क भरले आहे अशा महाविद्यालयांचे शुल्क पुढील प्रस्तावामध्ये समायोजित करण्याबाबत विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**<br>वाचा: १) विद्यापरिषदेच्या दि.०३/०९/२०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१०२(२).<br>२) विद्यापरिषदेच्या दि.२५/११/२०२४ रोजीच्या बैठकीतील दुरुस्ती ठराव क्र. ०१<br>संदर्भ क्र. १ अन्वये विद्यापरिषदेच्या दि.०३/०९/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र.१०२(२) खालीलप्रमाणे झालेला आहे.<br>"सदर बैठकीतील व यापुढील बैठकांमध्ये येणाऱ्या विषयांमध्ये स्थानिक चौकशी समितीने एका वर्षापेक्षा जास्त वर्षासाठी संलग्निकरणाच्या नुतनीकरणाची शिफारस केली असल्यास पुढील वर्षांचे संलग्निकरण शुल्क भरुन घ्यावे व नंतरच नुतनीकरणाचे पत्र देण्यात यावे. तसेच सदर महाविद्यालयांच्या तपासणीसाठी विद्यापीठाचे भरारी पथक ४ दिवसांची मुदत देऊन केव्हाही तपासणीसाठी भेट देईल आणि त्या भरारी पथकाचा प्रवास व दैनिक भत्ता याचा खर्च संबंधित महाविद्यालयांनी करावा असे सर्वानुमते ठरले."<br>त्यानुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित ज्या महाविद्यालयांचे दि.०३/०९/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये संलग्निकरणाचे विषय होते त्या महाविद्यालयांकडून ठराव क्र. १०२(२) नुसार विद्यापरिषदेकडून पुढील जेवढ्या वर्षांची मान्यता देण्यात आलेली आहे, पुढील तेवढ्या वर्षांचे संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे शुल्क भरणा करुन घेवून मान्यता पत्र देण्यात आलेले आहे.<br>तद्नंतर विद्यापरिषदेच्या दि.२५/११/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती ठराव क्र. ०१ झालेला आहे. (दि.०३/०/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १०२(२) चा दुरुस्ती ठराव).<br>"वरील ठरावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव दुरुस्त करण्यात आला.<br>१. स्थानिक चौकशी समितीने एका वर्षापेक्षा जास्त वर्षासाठी संलग्निकरणाच्या नुतनीकरणाची शिफारस केली असल्यास सदर महाविद्यालयांच्या तपासणीसाठी विद्यापीठाचे भरारी पथक ४ दिवसांची मुदत देऊन केव्हाही तपासणीसाठी भेट देईल आणि त्या भरारी पथकाचा प्रवास व दैनिक भत्ता याचा खर्च संबंधित महाविद्यालयांनी करावा असे सर्वानुमते ठरले. | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | २. ज्या महाविद्यालयांनी संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठी पुढील वर्षांचे शुल्क भरले आहे अशा महाविद्यालयांचे शुल्क पुढील प्रस्तावामध्ये समायोजित करण्यात यावे अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. "<br>सबब, संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठी ज्या महाविद्यालयांनी पुढील वर्षांचे शुल्क भरले आहे अशा महाविद्यालयांचे शुल्क पुढील प्रस्तावामध्ये समायोजित करण्याबाबत विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **संलग्निकरणाच्या नुतनीकरणासाठी ज्या महाविद्यालयांनी पुढील वर्षांचे शुल्क भरले आहे अशा महाविद्यालयांचे शुल्क पुढील प्रस्तावामध्ये समायोजित करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १३ ] | **अधिष्ठाता मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता महाविद्यालयातील पूर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाकरिता संलग्नीकरणाचे प्रस्ताव शुल्क आकारण्याचे सर्वानुमते ठरवून व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी:<br>वाचा: १) विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/५२१०, दि.२२/०७/२०२४.<br>२) विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/७२८१, दि.२६/०९/२०२४.<br>३) डॉ. पी. एम. पवार, प्रभार अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ यांचा दि.१०/१०/२०२४ रोजीच्या ई-मेल अन्वये प्राप्त अभिप्राय.<br>संदर्भ क्र. १ नुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी / संलग्निकरणाचा विस्तार / संलग्निकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार / निरंतर संलग्निकरण / महाविद्यालयीन नावातील बदल / महाविद्यालय बंद / अभ्यासक्रम बंद तसेच व्यवस्थापन हस्तांतरण करण्यासंदर्भातील प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत.<br>सदरील परिपत्रकानुसार बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाकरिता प्रति विषय रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतके शुल्क असलेबाबत महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे. परंतु, NEP २०२० नुसार बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. या अभ्यासक्रमामध्ये काही नविन विषयांची वाढ झालेली असल्याने, संलग्नित महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता महाविद्यालयातील पूर्वीच्या विषयानुसार शुल्क आकारावे की NEP २०२० नुसार जे विषय आहेत त्या प्रमाणात विषयांचे शुल्क आकारावे याबाबत दिनांक १९/०९/२०२४ रोजी सादर केलेल्या टिपणीवरील प्राप्त आदेशानुसार संदर्भ क्र. २ अन्वये प्रभारी अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता, प्रस्तुत विद्यापीठ यांना सदर प्रकरणी स्वयंस्पष्ट अभिप्राय तात्काळ सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.<br>त्यानुषंगाने संदर्भ क्र. ३ अन्वये डॉ. पी. एम. पवार, प्रभारी अधिष्ठाता, प्रस्तुत विद्यापीठ यांनी खालीलप्रमाणे आपला अभिप्राय सादर केला आहे.<br>" In reference to your communication on the subject mentioned above, I would like to offer my opinion as follows: | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | Since the BSc specializations under NEP २०२० are based on Major subjects that closely align with the previous curriculum, the fee structure may continue as it was for the earlier subjects. However, to ensure uniformity and formal compliance with the University ACT, this matter should be presented before the Board of Directors (BOD) and further processed in accordance with the provisions of the ACT."<br>त्यानुसार दिनांक १४/१०/२०२४ रोजी सादर केलेल्या टिपणीवर सदरील विषय अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्याचे आदेश प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने सदरील बाब दिनांक ११/१२/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये सादर केली असता, सदरील बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव क्र. ०८ झालेला आहे.<br>" शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता पुर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाकरीता संलग्नीकरण शुल्क आकारण्याचे सर्वानुमते ठरले, तरी सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. "<br>सबब, अधिष्ठाता मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता महाविद्यालयातील पूर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाकरिता संलग्नीकरणाचे प्रस्ताव शुल्क आकारण्याचे सर्वानुमते ठरवून व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **अधिष्ठाता मंडळाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. ए., बी. कॉम. आणि बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाकरिता महाविद्यालयातील पूर्वीप्रमाणे प्रत्येक विषयाकरिता संलग्नीकरणाचे प्रस्ताव शुल्क आकारण्याबाबत केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १४ ] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत B.P.Ed., M.P.Ed. तर School of Education या संकुलांतर्गत NEP धोरणानुसार B.A.B.Ed., B.Com.B.Ed., B.Sc.B.Ed., हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत B.P.Ed. आणि M.P.Ed. हा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्याकरीताचे प्रस्तावास मा. कुलगुरु महोदयांनी दि. ०६/११/२०२४ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता दिलेले असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये विविध प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने पुढील कार्यवाहीकरीता प्रस्ताव क्रीडा व व शारीरिक शिक्षण विभागाकडून संलग्नता विभागास दि. ०९/११/२०२४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये प्राप्त झाला होता.<br>त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत B.P.Ed. आणि M.P.Ed. हा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्याची बाब अधिष्ठाता मंडळाच्या दि.११/१२/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केली असता, त्यावर विषय क्र. ०७ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>"शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत आणि School of Education विभागांतर्गत NEP धोरणानुसार BA. B.Ed, B.COM. B.Ed & B.Sc. B.Ed & B.P.Ed आणि M.P.Ed. हा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्याची बाब विद्यापरिषदकडे सर्वानुमते शिफारस करण्यात आली."<br>उक्त निर्णयाच्या अनुरोधाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३३ (१) (च) मध्ये पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरु करण्यासंबंधी विद्या परिषदेने व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची तरतूद नमूद असल्याने सदरचा विषय दि. २८/१२/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर केला असता, त्यावर विद्यापरिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे. | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | "प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत आणि School of Education विभागांतर्गत NEP धोरणानुसार BA. B. Ed, B.COM. B. Ed & B.Sc. B. Ed & B.P. Ed आणि M.P.Ed. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु करण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत B.P.Ed., M.P.Ed. तर School of Education या संकुलांतर्गत NEP धोरणानुसार B.A. B.Ed., B.Com.B.Ed., B.Sc.B.Ed., हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु करण्यासाठी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागांतर्गत B.P.Ed., M.P.Ed. तर School of Education या संकुलांतर्गत NEP धोरणानुसार B.A.B.Ed., B.Com.B.Ed., B.Sc.B.Ed., हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने सुरु करण्यासाठी "क्रीडा व शारीरिक शिक्षण संकुल आणि शिक्षणशास्त्र संकुल" या दोन नवीन संकुलांच्या निर्मितीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच नियमानुसार सर्व मंजूरीच्या अधिन राहून विद्यापरिषदेने केलेल्या शिफारशीनुसार सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **Poornam Ecovision Foundation, Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ.**<br>टिपणी: Poornam Ecovision Foundation, Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (School of Life Science) यांच्याशी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. यामध्ये विदयार्थ्यांना Internship, Job Placement, Collaboration साठी फायदा होणार आहे. सदर सामंजस्य कराराचा मसुदा नवोपक्रम, नवसंशोधन नवसंशोधन व साहचर्य मंडळ या विभागाकडील Mo Cell Committee कडून तपासून घेतला असून, सदर सामंजस्य करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(झ) नुसार व्यवस्थापन परिषदेसाठी मान्यता घ्यावी लागणार आहे.<br>सबब, Poornam Ecovision Foundation, Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसूदा विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | **Poornam Ecovision Foundation, Pune व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (School of Life Science) यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराच्या मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठाशी सामंजस्य कराराचा मसुदा व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्थाशी करावयाच्या करारासाठी वापरण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठाशी सामंजस्य करार व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्था यांच्याशी सामंजस्य करार झाल्यास कराराचा विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या सर्व संकुलातील विद्यार्थी व शिक्षकांकरिता फायदा होईल.<br>यास्तव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठे यांच्याशी होणाऱ्या सामंजस्य कराराचा मसुदा व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्था यांच्याशी सामंजस्य करार करण्याचा मसुदा तयार करण्यात आलेला आहे.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठाशी सामंजस्य कराराचा मसुदा व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्थाशी करावयाच्या करारासाठी वापरण्याची बाब विचारार्थ. | पदवी अभ्यासक्रम प्रवेश विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठाशी करावयाचा सामंजस्य कराराचा मसुदा व इतर शैक्षणिक संस्था व शासकीय संस्थाशी करावयाच्या करारासाठीचा मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच कृषी विद्यापीठे, जिल्ह्याबाहेरील महाविद्यालये, महाराष्ट्राबाहेरील महाविद्यालये व खाजगी संस्था यांचेसोबतही सामंजस्य करार करण्यासही मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १७ ]</td><td>

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जंयती उत्सव प्रस्तुत विद्यापीठ आणि महाविद्यालयमध्ये साजरा करण्यासाठी अहिल्यारथ तयार करावयांच्याअनुषंगाने शिल्पसृष्टी, वाहन, फोटो, व्हीडीयो शुटिंग व इतर अनुषंगिक बाबीच्या खरेदी व खर्चाची बाब विचारार्थ.**

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यासाठी अहिल्यारथ तयार करण्याकरिता गठीत समितीची बैठक दि.१६/१२/२०२४ रोजी संपन्न झाली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

<table>
<tr><td>ठराव</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जयंती अहिल्यारथ अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन व कार्यावर आधारीत चित्र रथाकरिता चित्ररथाचे प्रारुपाबाबत चर्चा करण्यात आली. चित्ररथाची लांबी X रुंदी - १२ X १२, अहिल्यारथाची उंची - १५ फुट, अहिल्यादेवी होळकर यांची पूर्णाकृती पुतळयाची उंची -१० फुट, आणि अधीकृती पुतळा-५ फुट. पुतळयाच्या मागील बाजूस ८ फुट उंचीचा माहेश्वरी किल्ला (मध्यप्रदेश) अशा स्वरुपाचे चित्ररथ तयार करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.<br>अहिल्यारथ करीता आयशर टॅम्पो यांचे वापर करण्याचा निर्णय घेण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील आधरीत माहितीचे ५ X ३ फुट आकाराचे १० डिजिटिल बॅनर तयार करण्याचे ठरले. आयशर टॅम्पो यांचे वापर करुन अहिल्यारथ तयार करावयाचे आहे. समितीने अहिल्यारथाचे मार्ग ही निश्चित केले आहे. नियोजित वेळापत्रकानुसार अहिल्यारथाचे उद्घघाटन कार्यक्रम व समारोपाचे कार्यक्रम घेण्याचा ठरले. सदर कार्यक्रमाचे फोटो व व्हीडीयो शुटिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अहिल्यारथासाठी लागणाऱ्या सांऊड व लाईट सिस्टिकरिता Mini Genertator, Amplifier, Speakar खरेदी करणे आवश्यक आहे. अहिल्यारथाचे शिल्पसुष्टी तयार करण्याकरिता वाहन व वाहनासाठी लागणारे इंधन, सांऊड व लाईट सिस्टिम, इतर अनुषंगिक बांबीकरिता एकूण रु.१०,००,०००/- (दहा लक्ष रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे.</td></tr>
</table>

**(विषय) क्र.०२** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जंयती उत्सव प्रस्तुत विद्यापीठ आणि महाविद्यालयमध्ये साजरा करण्याबाबत अहिल्या महिला स्वसंरक्षण शौर्य प्रशिक्षण घेण्याबाबत समितीने केलेल्या खर्चाची बाब विचारार्थ.

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव प्रस्तुत विद्यापीठ आणि महाविद्यालयामध्ये उत्साहात साजरा करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या अहिल्या महिला स्वसंरक्षण शौर्य प्रशिक्षण समितीची बैठक दि.०७/१२/२०२४ रोजी संपन्न झाली आहे. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

<table>
<tr><td>ठराव</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव प्रस्तुत विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये अहिल्या महिला स्वसंरक्षण शौर्य प्रशिक्षण समितीने प्रस्तुत विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये शिबीर अंदाजे २७ महाविद्यालयांतील प्रति महाविद्यालय १०० विद्यार्थीनी अंदाजे २७०० विद्यार्थीनी एकत्रित शहर पोलिस आयुक्त मुख्यालय मैदान किंवा महाविद्यालयीन मैदान येथे डिसेंबर मध्ये एक दिवसीय अहिल्या महिला स्वंसरक्षण प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत समितीने शिफारस केली आहे.<br>सदर अहिल्या महिल स्वंरक्षण प्रशिक्षण खर्चाचा तपशील समितीने दिला आहे. स्टेज २०X२५,माईक व साऊंड सिस्टीम, २ नग एलईडी स्क्रिन, खुर्च्या, टीपॉय,मॅटींगसह सर्व अनुषंगिक बाबीसह. अंदाजे २७०० विद्यार्थीनी करीता अल्पोपहार, चहापान, पिण्याचे पाणी जार, बॅनर, कार्यक्रम पत्रिका, सहभाग विद्यार्थीनीना प्रमाणपत्र देण्याबाबत, प्रशिक्षक मानधन, T.A /D.A देण्यात यावे. प्रमुख अतिथीसाठी शाल व बुके, कार्यक्रमाच्या साठी लागणारे ई. अनुषंगीक बाबीचा समितीने शिफारस केली आहे.</td></tr>
</table>

उपरोक्त ठरावानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जयंती प्रस्तुत विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये अहिल्या महिल्या स्वंसरक्षण शौर्य प्रशिक्षण शिबिराला

</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र</td></tr>
</table>

लागणाऱ्या खरेदी व खर्चची रु. ३,३५,०००/-(तीन लक्ष पत्तीस हजार रुपये फक्त) इतक्या खर्चास विद्यापीठ फंडातून करण्याबाबत समितीने शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**(विषय) क्र.०३. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त दोन दिवसीय राज्यस्तरीय लोककला स्पर्धा व दोन दिवसीय एकांकिका स्पर्धाचे आयोजन करण्याबाबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव समितीने केलेली शिफारस व त्यासाठी लागणाऱ्या एकूण रु.२०,००,०००/- (रुपये वीस लक्ष रुपये फक्त) इतक्या खर्चाबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: दि.१७, डिसेंबर २०२४ रोजीच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव समिती बैठकीतील विषय क्र.४ अन्वये खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.

" राज्यस्तरीय लोककला स्पर्धा व एकांकिका स्पर्धा आयोजित करण्याबाबत " त्यासअनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त राज्यस्तरीय लोककला व एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यासाठी होणारा खर्च हा विद्यापीठ फंडातून करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली तसेच लोककला महोत्सव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना विद्यार्थी विकास विभाग यांनी निधी बाबत पत्र पाठविण्याबाबत कार्यवाही करुन निधी आणण्यासाठी पाठपुरावा कराव असे ठरले. |

उपरोक्त ठरावानुसार लोककला स्पर्धा आयोजित करण्यासाठी मंडप, साऊंडसिस्टीम,उद्घाटन, कलाकाराचे भोजन व निवास व्यवस्था,बक्षिस स्वरुपात ट्राफी, प्रमाणपत्र व समारोप या सर्वासाठी एकूण रु.१५,००,०००/- इतकी तसेच राज्यस्तरीत एकांकिका स्पर्धा आयोजनासाठी हुतात्मा स्मृतिमंदीराचे दोन दिवसाचे भाडे, बक्षिस स्वरुपात विद्यापीठांना देण्यात येणारी रक्कम प्रथम क्रमांकास ५१,०००/- द्वितीय क्रमांकासाठी रु.३१,०००/- व तृतिय क्रमांकासाठी रु.११,०००/- तसेच दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ५०००/- तसेच उद्वघाटन, कलाकाराने भोजन व निवास व्यवस्था, बक्षिस स्वरुपात ट्राफी, प्रमाणपत्र व समारोप यासर्वासाठी एकूण रु.५,००,०००/- इतक्या खर्चास व दोन्ही खर्चाची तरतुद विद्यापीठ फंडातून करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**(विषय) क्र.४ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जंयती उत्सव निमित्त अहिल्योदवी होळकर बिल्ले तयार करण्याबाबत रु. १,१०,०००/- (एक लक्ष दहा हजार रुपये फक्त) समितीने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.**

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव समितीने बिल्ले तयार करण्याबाबत दि.२०/१२/२०२४ रोजी समितीच्या बैठकीतील विषय क्र.०३ अन्वये खालील प्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव बिल्ले तयार करण्याबाबची समिती यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बिल्ले तयार करण्याबाबत त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सवा निमित्त बिल्ले तयार करण्यासाठी खालील प्रमाणे मजकुर व रचना करण्याचे ठरले.<br>प्रस्तुत विद्यापीठाने मान्यता दिलेला फोटो बिल्लेच्या मध्यभागी घेण्याचे ठरले.<br>(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बिल्लांचा आकार वर्तळाकार व वरच्या बाजूस प्रस्तुत विद्यापीठाचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर<br>बिल्लेच्या खालील बाजूस त्रिशताब्दी जयंती महोत्सव असा मजकूर घेण्याचे ठरले.<br>(२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बिल्ले तयार करण्याचे मटेरिअल मेटल-ब्रास (मेलामाईन कोटीग) / ॲक्रॅलिक (ईपॉक्सी कोटीग) / PVC प्लॉस्टीक (यास कोटीग नसते) या पैकी एका माध्यमाचे बिल्ले २" इंच व्यासाचे तयार करुन घेण्याबाबत सर्वोनूमते समितीने शिफारस केली आहे.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव बिल्ले तयार करुन घेण्यात आल्यानंतर प्रस्तुत विद्यापीठातील संविधानिक अधिकारी, प्राधीकरण सदस्य, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी यांना बिल्ले देण्याबाबत समितीने शिफारस केली.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव बिल्लेचे डिझाईन ललित कला संकुलाचे शिक्षक श्री. धनंजय टाकळीकर यांच्या कडून तयार करुन घेण्याचे ठरले. |

**(विषय)** क्र.५ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जंयती उत्सव निमित्त अहिल्योदवी होळकर प्रतिकृती तयार करण्याबाबत समितीने केलेली शिफारस रु.१५,००,०००/- (पंधरा लक्ष रुपये फक्त) खर्चाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

टिपणी: (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव समिती प्रतिकृती मूर्ती तयार करण्याबाबत दि.२०/१२/२०२४ रोजी समितीच्याबैठकीतील विषय क्र.०१ आणि ०२ अन्वये खालील प्रमाणे विषय सादर करण्यात आला होता.)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव प्रतिकृती तयार करण्याबाबची समिती यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिकृती तयार करण्याबाबत त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

**ठराव**

I. प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन ४८२ एकर परीसरातील प्रशासकीय इमारती समोरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक येथील मूर्तीकार श्री. राम सुतार यांनी तयार केलेला पुतळयाची प्रतिकृती मूर्ती तयार करण्यासाठी घेणेचे ठरले तशी शिफारस समिती कडून करण्यात आली.

II. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळयाच्या खालील चौथरा हा स्मारका मधील घेण्याचे ठरले. आणि समितीने त्यानुषंगाने शिफारस केली आहे.

III. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा तयार करण्यासाठी मूर्तीकाराने खालील साम्रगी आणि रसायनाचा वापर करण्याचे ठरले.

Matervial

अ. Fiber / Synthetic Marble ईत्यादी प्रकाराचे भरीव साम्रगी वापरावे असे समितीने शिफारस केली आहे. मा.कुलगुरु महोदयांच्या मार्गदर्शनानुसार मूर्तीचे मेटरीयल आणि कलर या संदर्भात निर्णय घेण्याचे ठरले.

ब. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मूर्ती बनविण्यासाठी तज्ञ व अनुभवी शिल्पकरांकडून त्यांनी केलेल्या पूर्वीच्या कामाचे नमूने (मॉडेल) मागऊन घेऊन त्याच्या नुसार त्यांचे पाहणी व परिक्षण करुन घेण्याचे ठरले.

क. तज्ञ अनुभवी शिल्पकाराकडून नमुना शिल्प प्रतिकृती (Master Piece) हे बनविण्यासाठी प्रत्यक्ष स्मारक स्थळास भेट देऊन तेथील ३६० मोजमाप घेवून व फोटो घेवून उत्कृष्ठ शिल्प प्रतिकृती (Master Piece) बनवून घेण्याची शिफारस केली.

ड. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा शिल्पकरांकडून केलेल्या कार्याचे परीक्षण केल्यानंतर विविध तज्ञाने तयार केलेले पुतळाचे शिल्प नमुना पाहून त्यामधील उत्कृष्ठ ३ कलाकरांपैकी एका शिल्पकाराला मुर्ती बनविण्याचे कार्यारंभ आदेश देण्यात यावे असे ठरले. व या मुर्तीच्या स्वामीत्व अधिकार विद्यापीठाकडे घेण्याचे ठरले.

मूर्तीचे सुबकता, सामुग्री, आकार यानुसार मूर्तीचे माफक दरात उपलब्ध करुन घेण्याची समितीने शिफारस केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त पुतळा प्रतिकृती साईज पुढील प्रमाणे.

प्रतिकृती तयार करण्याचे साईज

१. मोठी प्रतिकृती साईज- १६" उंची- (चौथरा व पूर्णाकृती शिल्पासह) नग १००
२. मध्यम प्रतिकृती साईज- १४" उंची- (चौथरा व पूर्णाकृती शिल्पासह) नग २००
३. लहान प्रतिकृती साईज- १२" उंची- (चौथरा व पूर्णाकृती शिल्पासह) नग २०० सुरक्षित साचेबध्द बॉक्स पॅकीग व व्हेलवेट कव्हरसह वरील उंची आकराचे एकूण ५०० नग शिल्प करीता अंदाजे रु. १५,००,०००/-(पंधरा लक्ष रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे.

**(विषय)** क्र.६ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जंयती महोत्सव निमित्त अहिल्योदवी होळकर यांच्या जीवन चरित्रांवर महानाटय आयोजित करण्याबाबत समितीने केलेली शिफारस खरेदी व खर्चाचेबाब विचारार्थ सादर.

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव जयंती निमित्त ललितकला व कला संकुल व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रांवर महानाटय आयोजित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर)

| | |
|---|---|
| ठराव | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन व चरित्रांवर महानाटय आयोजित करण्यात येणार आहे.सदर महानाटयासाठी अंदाजे येणाऱ्या खर्चा, लेखक मानधन रु.१५,०००/-, महानाटय नेपथ्य रचना रु.२,००,०००/-, महानाटय ध्वनी मुद्रण उच्चतम दर्जाचे रु.२,००,०००/-, महानाटय कलावंतचे वेशभूषा आणि रंगभूषा रु.१,००,०००/-, महानाटयसाठी करावी लागणारे तालीम व तयारी रु.५०,०००/-, महानाटय भव्य व दिव्य असल्याकारणाने उच्चतम प्रतिचे लाईट भाडेतत्वावर आणि ध्वनीमुद्रण रु.१,५०,०००/-, महानाटय हे सोलापूर आणि ग्रामीण भागात प्रयोग करण्याबाबत नाटयगृह आपण भाडेतत्वावर घेण्यास येणारा खर्च रु.२०,०००/-, महानाटय प्रयोगात काम करणाऱ्या कलावंत यांचे मानधन रु.१,००,०००/- इतर अनुषंगिक आणि होणाऱ्या प्रत्यक्ष खर्च रु.१५,००,०००/- (पंधरा लक्ष रुपये) अपेक्षित आहे. |

सबब, उपरोक्त ठरावानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव उत्सव प्रस्तुत विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये साजरा करण्यासाठी विषय क्र.०१ ते ०६ विविध उपक्रम करण्यासाठी होणाऱ्या खरेदी व खर्चास रु.६४,४५,०००/- तरतूद विद्यापीठ फंडातून करण्याची बाब समितीने केलेल्या शिफारशी विचारार्थ.

ठराव: **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव प्रस्तुत विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये साजरा करण्यासाठी विषय क्र.०१ ते ०६ येथील विविध उपक्रम करण्यासाठी होणाऱ्या खरेदी व खर्चासाठी रु.६४,४५,०००/- तरतूद विद्यापीठ फंडातून करण्यास व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव समितीने केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १८ ]</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त अहिल्यादेवी होळकर यांचा लोगो विद्यापीठाच्या लेटरहेड मध्ये वापरण्याबाबत दि.१७/१२/२०२४ च्या बैठकीत केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त दि.१७/१२/२०२४ रोजी मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. विद्यापीठाच्या लेटरहेडवर त्यांचा लोगो वापरण्याबाबत शिफारस बैठकीत करण्यात आली.<br><table><tr><td>ठराव</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विद्यापीठाचे लोगो आहे. लोगोच्या खाली "त्रिशताब्दी जयंती महोत्सव" वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ असे उल्लेख असेल. हा लोगो पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी दिलेल्या योगदानाची आठवण म्हणून वापरला जाईल. तो विद्यापीठाच्या मूल्यांचे प्रतीक आहेत. ज्यात स्त्री शिक्षण समानता आणि सामाजिक न्याय समावेश आहे.<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर लोगो विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर, पत्रव्यवहारात, प्रसिध्दीपत्रकात आणि इतर अधिकृत संवादा वापरला जाईल. विद्यापीठाच्या सर्व कार्यक्रमांमध्ये केला जाईल. ज्यामध्ये सेमिनार, कार्यशाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे. तसेच लोगो वापराची मुदत स्पष्ट असावी. सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षाकरिता असावी अशी समितीने शिफारस केली. (सोबत लोगोचा नमुना जोडला आहे.)</td></tr></table><br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव प्रस्तुत विद्यापीठाच्या लोगोमध्ये वापरण्यास व त्यासाठी होणाऱ्या अंदाज रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) इतकी तरतूद विद्यापीठ फंडातून करण्याची बाब समितीने केलेली शिफारस विचारार्थ.</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव निमित्त अहिल्यादेवी होळकर यांचा लोगो (मराठी व इंग्रजी) मध्ये विद्यापीठाच्या लेटरहेडमध्ये वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ दोन वर्षामध्ये वापरण्याबाबत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव समितीने दि.१७/१२/२०२४ च्या बैठकीत केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | **दिनांक ०९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात विद्यापीठ कायदा अधिकारी यांचा लेखी स्वयंस्पष्ट अभिप्राय घेण्यात यावा व कायदा अधिकारी यांच्या अभिप्रायासह सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेरविचार करुन सदरचा विषय पुनश्च व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठराव करण्यात आला होता. ठरावानुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या फेरविचारार्थ.**<br>टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१३ वरील ठरावानुसार कार्यवाही करण्यात येवून मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेनुसार सदर SHPC Pvt. Ltd. या गोपनीय फर्मला कायदेशीर नोटीस पाठविण्यासाठी सदरचे प्रकरण कायदा विभागाकडे वर्ग करण्यात आले होते. सदर प्रकरणी सदर फर्मची देयकासंदर्भात सर्व कागदपत्रांची तपासणी केली असता मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व कायदा अधिकारी यांच्या झालेल्या तोंडी चर्चेनुसार सदर गोपनीय फर्मला दि.२८/०२/२०२० रोजी देण्यात आलेले कार्यारंभ आदेश व त्यानुसार त्याचे तयार झालेले बिल व सदर फर्मला दि.०२/०१/२०२३ रोजी देण्यात आलेले कार्यारंभ आदेश ह्या वेगळ्या असून दोन्ही कार्यरंभ आदेशाचा अभ्यास करून भविष्यात कोणतीही कायदेशिर पेच निर्माण होवू नये म्हणून सदर प्रकरणी दि.१७ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेमध्ये झालेला ठराव फेरविचारार्थ ठेवण्यात आला होता.<br>व्यवस्थापन परिदेच्या दि.०९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या ठरावानुसार त्रिसदस्यीय समिती, वित्त व लेखा अधिकारी- निमंत्रित सदस्य व SHPC Technology Pvt. Ltd फर्मचे प्रो. प्रेमजित राऊत यांची दि.०६/०१/२०२५ रोजी व्यवस्थापन परिषद सभागृह येथे बैठक पार पडली सदर बैठकीत कायदा अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिप्रायाचे अवलोकन करुन चर्चे अंती सर्वानुमते खालील प्रमाणे शिफारस केली आहे.)<br><u>समितीने खालील प्रमाणे शिफारस:-</u><br>SHPC Technology Pvt. Ltd या फर्मला मार्च २०२० च्या परीक्षेच्या कामाची अदा केलेली अधिकचे रक्कम रूपये [१,८०,६८०/- (without GST)] तथा [२,१३,२०२/- (GST सह)] ही मार्च २०२४ च्या परीक्षा देयकामधून वजा करण्यास SHPC Technology Pvt. Ltd यांचे प्रतिनिधी प्रो. प्रेमजित राऊत यांनी सहमती दर्शविल्याने मार्च २०२४ च्या परीक्षा कामाच्या देयकातुन सदर रक्कम वजा करता राहिलेली रक्कम अदा करण्यास सर्वानुमते शिफारस करण्यात येत आहे.<br>सबब, दि.१३ जुन, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीने व्यवस्थापन परिषद दि.०९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या ठरावानुसार विद्यापीठ कायदा अधिकारी यांच्या दि.१५/०१/२०२५ रोजीच्या लेखी स्वयंस्पष्ट अभिप्रायाचे अवलोकन करुन चर्चे अंती दि.१६/०१/२०२५ रोजी केलेली शिफारस फेरविचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग (गोपनिय विभाग) |
| ठराव: | **व्यवस्थापन परिषदेमध्ये SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेरसादर केलेल्या शिफारशी स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २० ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणे कामी न्युनतम दर असलेले फर्म मे. श्री माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांच्यासोबत करावयाच्या वार्षिक दरकराराचा मसुदा व वार्षिक दरकरार करण्याची बाब विचारार्थ.** | आवक-जावक विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणेकामी न्यूनतम दर असलेले मे. श्री माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांना दरकरारानुसार खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| तपशिल | दर सर्व करासहित पोहोच देणे प्रत्येकी २०० ग्रॅमपर्यंत दर | दर सर्व करासहित पोहोच देणे प्रत्येकी २०० ग्रॅमपुढील दर | टपाल पोहोचण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| सोलापूर शहर | २८ | १८ | २४ तास |
| संपूर्ण सोलापूर शहर | ४८ | २५ | |
| संपूर्ण महाराष्ट्र | ५० | २८ | २४ ते ४८ तास |
| आंतरराज्य | ६३ | ३० | ७२ ते ९६ तास |

उपरोक्तप्रमाणे टपाल सेवा पुरविण्यासाठी दर व कालावधी ठरविण्यात आलेला असून दरकरार, पुरवठा आदेश, सुरक्षा ठेव स्विकारणे इत्यादी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्यानुसार दि.२४/०१/२०२५ रोजीची टिपणी सादर केली असता, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यास मा. कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणे कामी न्युनतम दर असलेले फर्म मे. श्री माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांच्यासोबत करावयाच्या वार्षिक दरकराराचा मसुदा व वार्षिक दरकरार करण्याची बाब विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणे कामी न्युनतम दर असलेले फर्म मे. श्री माऊली कुरिअर सर्व्हिस, सोलापूर यांच्यासोबत करावयाच्या वार्षिक दरकराराचा मसुदा व वार्षिक दरकरार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ २१ ] | **दि.२३/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.२३/०१/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२३/०१/२०२५ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.२३/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या दि.२३/०१/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **दि.२३/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेल्या दि.२३/०१/२०२५ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २२ ] | **वस्तु व सेवा याची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता २०१२ मधील 4.6 (a) Purchase of the articles consting upto Rs.1,000/- or amended from time to time may be effected without calling quotations from the supplier तरतूदीनुसार या विद्यापीठात रुपये १,०००/- पर्यंतची खरेदी प्रत्यक्ष/दरपत्रके न मागविता करण्यात येते. अशी तरतूद आहे. त्यामध्ये वित्त व लेखा समितीमधील बैठक दि.११/१०/२०१५ मंजूर ठराव क्र.४ व व्यवस्थापन परिषद बैठक दि.१९/१०/२०१३ मधील मंजूर ठराव क्र.०८ अन्वये प्रत्यक्ष खरेदी रुपये १,०००/- च्या मर्यादेत वाढ करुन रु.५,०००/- अशी करण्यात आली आहे.<br>सध्या रु.५,०००/- ते २५,०००/- पर्यंतची वस्तु / सेवा यांची खरेदी करताना बऱ्याच वेळा फर्मकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे दरपत्रके प्राप्त होत नाहीत. तसेच सोलापूर विद्यापीठ हे शहरापासून ८ कि.मी. इतके दूर असल्यामुळे सदर फर्म विद्यापीठात येऊन दरपत्रके भरत नाही. त्यामुळे सदर प्रक्रियेला मुदत वाढ द्यावी लागते व सदर वस्तु/सेवेची खरेदी प्रक्रिया वेळेत पूणे करता येत नाही. सध्या २०१३ पेक्षा महागाईमध्ये खूपच वाढ झाल्याने प्रत्यक्ष खरेदी मर्यादेमध्ये काळानुरुप वाढ करणे आवश्यक आहे. ही विचारात घेता, खरेदीची मर्यादा रु.२५,०००/- पर्यंत वाढविणे उचित वाटते. यामुळे खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल.<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई व ICT विद्यापीठ, मुंबई यांनी प्रत्यक्ष खरेदीची मर्यादा रुपये २५,०००/- अशी केलेली आहे.<br>समान लेखा संहिता २०१२ मधील तरतूद Appendix-I मधील<br>Note - 1) All the financial powers delegated above are subject to the provisions of the Maharashtra Universities Act, 2016 (as amended from time to time) and the statutes and Ordinances framed there under and the rules, norms and procedure laid down by the Management Council from time to time and other prevailing rules नुसार वस्तु/सेवा याची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस आहेत. GFR 2017 मधील कलम क्र.१५४ तरतुदीप्रमाणे रुपये २५,०००/- जो विभाग प्रत्यक्ष खरेदी करेल अश्या विभागप्रमुखांकडून खरेदी बाबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येईल. | वित्त व लेखा विभाग |

"I, am personally satisfied that these goods purchased are of the requisite quality and specification and have been purchased from a reliable supplier at a reasonable price."

सबब, वस्तु / सेवा यांची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविणेसाठीची बाब वित्त व लेखा समितीपुढे विषय क्र.०२ अन्वये विचारार्थ सादर केली असता त्यावर सर्वकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :** वस्तु व सेवा याची दरपत्रकाशिवाय / प्रत्यक्ष खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्यास व त्याची एकूण वार्षिक मर्यादा रुपये १,५०,०००/- पर्यंत ठेवण्यास सर्वानुमते मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, वस्तु व सेवा याची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **वस्तु व सेवा याची दरपत्रकाशिवाय खरेदी करणेची मर्यादा रुपये २५,०००/- पर्यंत वाढविण्याची वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचे विषय सादर केले.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२३(१)] | विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यापुढे तयार करण्यात येणाऱ्या लेटर हेडवर, विद्यापीठातील सर्व विषयांमधील कागदपत्रात "India" ऐवजी "भारत" उल्लेख करण्याबाबत व सर्व कागदपत्रावरसुध्दा India, Indian ऐवजी भारत, भारतीय हा शब्द वापरण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | सदरचा विषय अमान्य करण्यात आला. तथापि, विद्यापीठाच्या लेटर हेडवर "भारत" मराठी भाषेत व "India" इंग्रजी भाषेत लिहण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२३(२)] | **विशेष कार्यासन अधिकारी नेमणुकीची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये विविध पायाभूत सुविधा निर्मिती व विकासाच्या दृष्टिकोनातून विविध प्रकल्पाची सुरुवात झाली आहे विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे व खेलो इंडिया प्रकल्पाचे बांधकामाचे काम पूर्णत्वास येत आहे. तसेच विद्यापीठा मध्ये पायाभूत सुविधा व शिक्षण आणि संशोधन विकासा करिता पी.एम. उषां आतर्गत निधी प्राप्त झाला आहे.<br><br>विद्यापीठाने शासनाकडे पायाभूत सुविधाच निर्मिती करिता विविध प्रकल्पाचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने विद्यापीठाचा नवीन ४८२ एकर परिसरा मधील वन जमीन आरक्षण, जलसंधारण, तलाव खोलीकरण व सुशोभीकरण,अंतर्गत रस्ते, पुणे ते सोलापूर महामार्गाच्या मुख्य रस्ता पासून विद्यापीठास जोडणारा मुख्य रस्ता, मुलांचे व मुलींचे नवीन वसतिगृह प्रस्ताव, दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिक्षण सुविधा केंद्र, तृतीय पंथीय विद्यार्थ्यांकरिता शिक्षण व सुविधा केंद्र, वारकरी संप्रदाय आंतरराष्ट्रीय संशोधन प्रशिक्षण केंद्र, डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय व सबलीकरण केंद्र, भारतरत्न रतन टाटा अभियांत्रिकी संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्री शताब्दी जयंती महोत्सव विविध उपक्रम निधी प्रस्ताव, कौशल्य विकास केंद्र नवीन इमारत प्रस्ताव, विद्यापीठाचे संविधानिक अधिकारी ,शिक्षक आणि कर्मचारी यांच्या करिता निवासस्थाने असे अनेक इतर प्रस्ताव शासन दरबारी सादर केले आहेत. सदर प्रस्ताव जर विद्यापीठात पूर्णत्वास आले तर विद्यापीठाचा अधिक गतिमान पणे विकास होऊ शकेल. या प्रस्तावांचा पाठपुरावा करून शासनाकडून भरघोस निधी प्राप्त करून घेण्यासाठी व त्या कामा करिता सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे.<br><br>या विविध प्रस्तावाचा पाठपुरावा करून शासनाकडून मान्यता व निधी मिळण्याकरिता विद्यापीठामध्ये एका स्वतंत्र विशेष कार्यासन अधिकाऱ्याची गरज आहे. तो विशेष कार्यासन अधिकारी हा महाराष्ट्र व केंद्र शासनाची संपर्कात राहून विविध शासकीय कार्यालय व आस्थापने शी संपर्क करून विद्यापीठात हे प्रकल्प कसे येतील आणि त्याकरिता शासन भरघोस निधी कसा देईल यासाठी प्रयत्न करेल. तसेच विविध खाजगी कंपन्यांच्या मार्फत सामाजिक उत्तरदायित्व निधी CSR मधून देखील निधी प्राप्त करून घेऊन प्रकल्प पूर्णत्वास आणण्याकरिता प्रयत्न करेल.<br><br>सदर बाबींचा विचार करता अशा कार्याची पूर्तता करण्यासाठी एक प्रशासन कुशल, इंग्रजी मराठी हिंदी या भाषेवर प्रभुत्व असणारा, महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासन यांच्याशी संपर्क करून योग्य समन्वय साधणारा व विद्यापीठाच्या विकासासाठी सदर प्रकल्पाची गरज आहे हे पटवून देणाऱ्या विशेष कार्यासन अधिकाऱ्याची गरज आहे. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र |

| | | |
|---|---|---|
| | हा विशेष कार्यासन अधिकारी या पदावर वर नमूद केलेल्या निकषा नुसार एका पात्र व्यक्तीची विविध प्रकल्पाचा मान्यता व निधी प्राप्ती करिता नियुक्ती विद्यापीठ फंडातून केल्यास विद्यापीठाचे विविध प्रलंबित प्रकल्प जलद गतीने पूर्णत्वास येण्याकरिता मदत होऊ शकेल.<br>सबब विद्यापीठाचे विविध प्रस्तावित प्रकल्प व प्रस्ताव याचा पाठपुरावा करून शासनाकडून मान्यता व भरघोस निधी खाजगी कंपन्यांकडून सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) प्राप्ती करून घेण्याकरिता. एक विशेष कार्यासन अधिकारी नेमण्याची बाब व्यवस्थापन परिषदेत सादर व त्या कार्यासन अधिकाऱ्याचे मासिक वेतन विद्यापीठ फंडातून करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **विशेष कार्यासन अधिकारी ६ महिन्याकरिता घेण्यास व त्यांना प्रतिमाह रु.४०,०००/- इतके मानधन विद्यापीठ फंडातून आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच विशेष कार्यासन अधिकारी नेमणुकीबाबत खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्यात आली.**<br>**१. प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा : अध्यक्ष**<br>**२. डॉ. अजित माधव पाटणकर : सदस्य**<br>**४. श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील : सदस्य**<br>**३. योगिनी घारे : सदस्य-सचिव** | |

मा. कुलगुरुमहोदय यांच्या निर्देशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना सन २०२४-२५ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रकाच्या प्रती अभ्यास करण्यासाठी देण्यात आल्या.

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद